# विशेष पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

दिनांक :- २१/०३/२०२५

**सराईत गुन्हेगार अविनाश अमन जोगळेकर याचे कडुन यवतमाळ शहरातील ३ घरफोडी उघडकीस आणून गुन्हयातील ४,७७,६६३/- रु. चा मुददेमाल जप्त**

**स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ ची कारवाई**

यवतमाळ शहरामध्ये चोरी व घरफोडया चे प्रमाण वाढले असुन सदर गुन्हे उघडकीस आणण्याचे मोठे आव्हान पोलीसांसमोर उभे असतांना मा. पोलीस अधीक्षक सो. यवतमाळ यांनी सदर गुन्हयांकडे विशेष लक्ष देवुन गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांना दिले होते.

अशातच आज दिनांक २१/०३/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गोपनिय बातमीदारा कडुन सराईत गुन्हेगार अविनाश अमन जोगळेकर हा चोरीतील सोने विकणेकरीता आझाद मैदान परीसरात थांबून असल्याची माहीती मिळाली त्या वरुन सपोनि संतोष मनवर व पथकाने त्यास आझाद मैदान येथील लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्याजवळून त्यास १६.३० वा. च्या सुमारास ताब्यात घेवुन त्याची अंग झडती घेतली असता त्याचे पॅन्टचे असलेल्या खिशात एका पांढऱ्या रंगाच्या रुमालामध्ये सोन्याचे दागीने मिळून आले सदर दागीन्यांबाबत अविनाश जोगळेकर यास कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने यवतमाळ शहरामध्ये खालील प्रमाणे गुन्हे केल्याची कबुली दिली.

1. **पोलीस स्टेशन यवतमाळ शहर अ.प.क्र. २६/२०२५ कलम ३०५ (अ), ३३१ (३), ३३१ (४), भा.न्या.सं.**
2. **पोलीस स्टेशन यवतमाळ शहर अ.प.क्र. ४१/२०२४ कलम ४५४, ३८० भा.दं.वि.**
3. **पोलीस स्टेशन अवधुतवाडी अ.प.क्र. ५८२/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भा.दं.वि.**

अविनाश अमन जोगळेकर याचे ताब्यातुन वरील गुन्हयांमध्ये चोरी गेला सोन्याचा मुदेमाल खालील प्रमाणे जप्त करण्यात आला.

| अ.क्र. | सोन्याचे विवरण | वजन |
|---|---|---|
| १ | सोन्याची कानातील बाळी | ०.२६० मिली ग्रॅम |
| २ | सोन्याची कानातील नथ | ०.७५० मिली ग्रॅम |
| ३ | सोन्याचे एक डोरले मण्याची पोत | ६०० मिली ग्रॅम |
| ४ | सोन्याचे १२ नग गहु मणी | १.३९० मिली ग्रॅम |
| ५ | सोन्याची पोत | १० ग्रॅम |
| ६ | सोन्याचे ओम असलेले लॉकेट | ०.५ ग्रॅम |
| ७ | सोन्याचे मोतीचैन | ८.७७० मिली ग्रॅम |
| ८ | सोन्याचे मंगळसुत्र वाटी जोड व त्यास गंठन | ९.७५० मिली ग्रॅम |
| ९ | सोन्याचा गोपी गोफ | ६.६४० मिली ग्रॅम |
| १० | सोन्याचे कानातील जोड | १.०२० मिली ग्रॅम |
| ११ | सोन्याची अंगठी | ३.६९० मिली ग्रॅम |
| १२ | कानातील टॉप्स | २ ग्रॅम |
| १३ | सोन्याचे कानातील खडे | २.९०० मिली ग्रॅम |
| | **एकुण** | **५३ ग्रॅम ६७० मिली चा मुद्देमाल किंमत ४,७७,६६३/-** |

सदर ची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक यवतमाळ श्री. कुमार चिंता सा., अपर पोलीस अधीक्षक श्री. पियुष जगताप सा., पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ श्री. सतिश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संतोष मनवर सफौ/ योगेश गटलेवार, पोहवा/अजय डोळे, पोहवा/विनोद राठोड, पोहवा/ प्रशांत हेडाऊ पोहवा/ निलेश राठोड, पोहवा/रितुराज मेडवे, पोशि/आकाश सहारे सर्व स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

**(संतोष मनवर)**
सहायक पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ.